आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ ऑगस्ट २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- सार्वजनिक  बँकिंग क्षेत्रात सुधारणांसाठी केंद्र सरकार लौकरच उच्चस्तरीय समिती नेमणार

- एनटीए युजीसी-नेट च्या तीन विषयांची फेरपरीक्षा घेणार

- काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

- बिहारमध्ये अशोक धाम मंदिराजवळ चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू, तर
- पश्चिम बंगालमध्ये बीरभूम जिल्ह्यात एका हॉटेलला लागलेल्या आगीत सात जण ठार, अनेक जण जखमी

**आणि**

- बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेला नवी दिल्लीत प्रारंभ

**<><><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांमधे सुधारणांसाठी केंद्र सरकार लौकरच उच्चस्तरीय समिती स्थापन करणार असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्ली इथं दिली. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या. विकसित भारताच्या उद्दिष्टाला आकार देण्याचं काम बँकांमार्फत होणार असून ही समिती त्यादृष्टीनं सुधारणा सुचवेल असं त्या म्हणाल्या.

- **- - होल्ड - बाईट - -**

सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका आणि इतर वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत भाग घेत आहेत.

**<><><><><>**

'ब्रिक्स' देशांच्या पर्यावरण मंत्र्यांची बैठक उद्या भारताच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात  'अनुकूलन, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी पायाभरणी' या मध्यवर्ती संकल्पनेच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा होईल. शाश्वत

जीवनशैलीला प्रोत्साहन, वनीकरण, वणवा व्यवस्थापन आणि आपत्तीची स्थिती हाताळण्याची सक्षमता, चक्रीय अर्थव्यवस्था आणि अनुकूलन ही चार प्राधान्य क्षेत्रं भारताने निश्चित केली आहेत, असं पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयानं सांगितलं. या बैठकीपूर्वी आज 'ब्रिक्स'चा पर्यावरण कार्यगट तसंच हवामान बदल आणि शाश्वत विकाससंबंधीच्या संपर्क गटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक पुण्यात होणार आहे.

**<><><><><>**

युजीसी-नेट परीक्षेच्या इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये अनेक चुका असल्याच्या तक्रारी आल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीएनं या तीन विषयांची फेर परीक्षा घेण्याची घोषणा केली आहे. येत्या ९ सप्टेंबरला सकाळी ९ ते दुपारी १२ या पहिल्या सत्रात इंग्रजी विषयाची तर दुपारी ३ ते संध्याकाळी ६ या दुसऱ्या सत्रात वाणिज्य विषयाची फेरपरीक्षा होईल. समाजशास्त्र विषयाची फेरपरीक्षा दुसऱ्या दिवशी १० सप्टेंबरला सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळात होईल. या परीक्षांची उत्तरसूची काल एनटीएने प्रकाशित केली.

**<><><><><>**

बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या विरोधात दाखल झालेल्या याचिकेची सुनावणी थांबवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाला दिले आहेत. या प्रकरणी सीबीआय किंवा सक्त वसुली संचालनालयाने कोणताही अहवाल अलाहाबाद उच्च न्यायालयात सादर करु नये, असंही न्यायालयाने सांगितलं. उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी राहुल गांधी यांची याचिका सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर सुनावणीला आली आहे. त्यावर न्यायालयाने प्रतिवादी पक्षकारासह सीबीआय आणि ईडीला नोटिसा बजावल्या आहेत.

**<><><><><>**

सिक्किममधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरिक्षण करताना २००२ हे आधारवर्ष ठरवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. सिक्किमीज मूलनिवासी सुरक्चा संघ या स्थानिक स्वयंसेवी संघटनेनं १९९३ हे

आधारवर्ष पुनरिक्षणासाठी ठरवण्याचे निर्देश मागणारी याचिका दाखल केली आहे, मात्र एकदा पुनरिक्षण सुरु झाल्यानंतर मधेच आधारवर्ष बदलता येणार नाही असं न्यायालयाने स्पष्ट केलं.

<><><><><>

झारखंडमधे स्पर्धापरीक्षा सुधारणांच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी राज्य सरकारने चर्चा सुरु केली आहे. ६ विद्यार्थी आंदोलकांनी उपोषण सुरु केल्याला आज २४ दिवस झाले आहेत. आज दुपारी २ वाजता राज्य सरकारशी चर्चा होणार असल्याचं आंदोलक विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीने वृत्तसंस्थेला सांगितलं. झारखंडमधली राज्य लोकसेवा आयोगाची १४वी परीक्षा रद्द करावी अशी मागणी आंदोलक करीत आहेत.

<><><><><>

बिहारमध्ये लखीसराय जिल्ह्यातल्या अशोक धाम मंदिर मार्गावर आज झालेल्या चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू झाला. या मंदिरात श्रावणी सोमवारच्या निमित्ताने जलाभिषेक करण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती. या दुर्घटनेत दहापेक्षा जास्त भाविक जखमी झाले आहेत. त्यांना पाटणा वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अशोक धाम स्थानकापासून मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर विजेचा खांब पडून त्यात वीजप्रवाह वाहत असल्याची अफवा पसरल्यामुळे गोंधळ निर्माण झाला आणि उपस्थित भाविकांची धावपळ झाली. त्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. मृतांच्या कुटुंबाविषयी सहवेदना व्यक्त करून त्यांनी जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेविषयी शोक व्यक्त केला आहे. तसंच स्थानिक प्रशासनाला सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश प्रधानमंत्र्यांनी दिले आहेत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रति सहवेदना व्यक्त करत जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात केली आहे. मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांना दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसंच, जखमींना त्वरित आणि योग्य वैद्यकीय उपचार मिळतील याची खात्री करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये बीरभूम जिल्ह्यात आज एका हॉटेलला लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले. श्रावणी सोमवारच्या निमित्ताने इथल्या तारापीठ मंदिरात आलेले अनेक भाविक या हॉटेलमध्ये मुक्कामाला उतरले होते. पहाटे साडेचारच्या सुमाराला हॉटेलच्या चौथ्या मजल्यावर आग लागली. अग्निशमन दलाला माहिती मिळताच त्यांनी ताबडतोब धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवत अडकलेल्या भाविकांची सुटका केली.

**<><><><><>**

एफआयएच हॉकी विश्वचषक स्पर्धा 2026 मध्ये पुरुष गटात भारतीय संघाचा सामना आज इंग्लंडशी होणार आहे. या सामन्यात विजयी होणारा संघ ड गटात अव्वल स्थान पटकावून थेट उपांत्य फेरीत जाणार असल्यानं या सामन्याला विशेष महत्व आहे. या आधी झालेल्या सामन्यांमध्ये भारतानं वेल्स संघावर विजय मिळवला आहे.

महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारताने बलाढ्य चीनला काल 2-2 असं बरोबरीत रोखलं.

**<><><><><>**

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक विजेतेपद स्पर्धेला नवी दिल्ली इथं सुरुवात झाली असून एम आर अर्जुन आणि हरिहरन अंशकरुणन या जोडीनं दुहेरीतला पहिला सामना जिंकला आहे.

पी. व्ही. सिंधू, आयुष शेट्टी, महिला दुहेरीची जोडी ट्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद, पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी, तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांचे सामने आज होणार आहेत.

**<><><><><>**

गॉल इथं सुरू असलेल्या श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या आजच्या तिसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव ४६२ धावांवर संपला. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव गडगडला. मानव सुतारच्या नेतृत्वाखाली भारतीय गोलंदाजांनी अचूक मारा करत श्रीलंकेच्या फलंदाजीला खिंडार पाडलं. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा श्रीलंकेच्या ५ बाद १४६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यातील प्राचीन अमरनाथ मंदिरासाठीची १२ दिवसांची वार्षिक 'श्री बुढा अमरनाथ यात्रा' आज सकाळी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत सुरू झाली. ही यात्रा २८ ऑगस्टपर्यंत चालणार असून श्रावण पौर्णिमेला तिची सांगता होईल. प्रशासनानं राजौरी, पुंछ आणि प्रवासाच्या मार्गांवर कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे.

//<><><><><>//